## निशाणी १ खालील आदेश

(घोषीत दिनांक ०१ एप्रिल, २०२२)

१. अर्जदारांनी सदर अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे, की दत्तात्रय गोपीचंद भारती दिनांक ०३.०२.२०१९ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार नं.१ मयताची पत्नी, अर्जदार नं. २ ते ५ मयताच्या मुली, अर्जदार नं.६ मयताचा मुलगा अर्जदार नं.७ ते ९ मयताची नातवंडे आणि अर्जदार नं.१० मयताची सून आहे. अर्जदार नं. ७ ते ९ यांचे वडील व अर्जदार नं.१० चे पती ओम दत्तात्रय भारती हे मयत आहेत. अर्जदार हेच मयत दत्तात्रय यांचे जवळचे व कायदेशीर वारस असून त्यांचेव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही नातेवाईक नाहीत. अर्जदारांना मयताच्या पश्चात शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जातील कथनाचे पुष्ट्यर्थ अर्जदारांनी निशाणी ७ वर शपथपत्र दाखल केले आहे.

३. त्याप्रमाणे दैनिक लोकप्रश्न या वर्तमानपत्रात दिनांक १४.०२.२०२२ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली. सदर जाहीर नोटीस निशाणी १२ वर दाखल आहे. सदर प्रकरणात जाहीरनामा प्रसिद्ध केलेबाबतचा अहवाल निशाणी ०९ वर दाखल आहे. निशाणी ५ वर दत्तात्रय गोपीचंद भारती यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल आहे.

४. अर्जदार नं.६ गणेश यांनी निशाणी १३ वर पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे, की दत्तात्रय गोपीचंद भारती दिनांक ०३.०२.२०१९ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार नं.१ मयताची पत्नी, अर्जदार नं. २ ते ५ मयताच्या मुली, अर्जदार नं.६ मयताचा मुलगा अर्जदार नं.७ ते ९ मयताची नातवंडे आणि अर्जदार नं.१० मयताची सून आहे. अर्जदार नं. ७ ते ९ यांचे वडील व अर्जदार नं.१० चे पती ओम दत्तात्रय भारती हे मयत आहेत. अर्जदार हेच मयत दत्तात्रय यांचे जवळचे व कायदेशीर वारस असून त्यांचेव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही नातेवाईक नाहीत. अर्जदारांना मयताच्या पश्चात शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जदार यांनी दिलेल्या पुराव्यास कोणीही आवाहन दिले नाही. त्यामुळे सदर पुरावा जाहीर नोटीसीच्या प्रसिद्धीपासून अविचल व अबाधीत राहिला. सदर अर्जास आजपर्यंत कोणीही आक्षेप घेण्यासाठी हजर झाले नाही.

५. दि बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाचे मान्यतेने मयत व्यक्तीचे वारसदार हे सक्षमपणे प्रतिनिधीत्व करु शकतात. नियम २ चे तरतुदीनुसार न्यायालयाने वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक किंवा प्रशासक यांना त्यांचे हक्क मान्य करण्यासाठी, त्यांनी दाखल केलेल्या अर्जावरुन जाहीर प्रगटनानंतर एक महिन्याचे आत अर्जदारांचे हक्काबाबत आक्षेप नोंदविणे गरजेचे असते. तसेच नियम ७ चा दुसरा भाग असे विहित करतो की, सदरचे प्रमाणपत्र हे कोणत्याही मिळकतीवरील हक्क निश्चित करीत नसून ते फक्त व्यक्तीचे वारसासाठी सद्य परिस्थितीवरील कायदेशीर व्यवस्था दर्शविते. तसेच अशाप्रकारे मंजूर केलेले प्रमाणपत्र अंतिमतः हक्क निर्णित करीत नाहीत किंवा इतरांचे हक्कास इजा अथवा हानी पोहचवत नाही.

६. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार वारस प्रमाणपत्र मागत आहेत. याकामी इतर कोणीही हजर राहून आक्षेप अथवा हरकत नोंदविलेली नाही. दिनांक १४.०२.२०२२ रोजीपासून आजपावेतो प्रस्तुत अर्जास कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. त्यामुळे अर्जदारांचा पुरावा अभेद्य व कायम राहिला आहे. त्यामुळे अर्जातील नमुद वारस हे मयत दत्तात्रय गोपीचंद भारती यांचे मान्यताप्राप्त वारस असल्याचे दिसून येते. करिता, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदीनुसार अर्जदार कुसूम दत्तात्रय भारती, मिराबाई दिगांबर गिरी, सुकन्या उर्फ शिवकन्या अरुण पूरी, उमा राजन गिरी उर्फ गोसावी, सुमन विष्णू पूरी, गणेश दत्तात्रय भारती, महेश ओम भारती, गायत्री ओम भारती, अमर ओम भारती व संगिता ओम भारती हे मयत दत्तात्रय गोपीचंद भारती यांचे मान्यताप्राप्त वारस आहेत.

३. अर्ज निकाली काढण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MANISHA NAMDEO THORAT
Date: 2022.04.01 16:57:40 +0530

(मनिषा ना. थोरात)

दिनांक ०१.०४.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, केज

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file are word to word same as per original Judgment/Order.

Dictated on : 01.04.2022

Transcribed on : 01.04.2022

Checked and signed on : 01.04.2022

Sd/-
(Hanumant B. Suryawanshi)
Steno Grade-III
Jt. CJJD & JMFC Court, Kaij